**भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.३४८/२०१३ मधील**

**निशाणी क्रमांक २४ खालील आदेश**

**(CNR No.MHWS050002002012)**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांचेतर्फे ग्रामपंचायत शेंदोणा सरपंच, पोलीस पाटील यांनी दिलेला वारसांचा अहवाल, मयत अर्जदार केवलराव रामधन पवार यांचे मृत्यूप्रमाणपत्राची सत्यप्रत आणि त्यांचे आधारकार्डच्या छायांकीत प्रती, वारसांचे प्रमाणपत्र, मृत्यूप्रमाणत्र, सहा आधारकार्ड यांच्या प्रती अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. अर्जदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री. एस.एस.भिंगारे यांचा आणि गैरअर्जदार यांचेतर्फे सहा. सरकारी वकील श्री. आर.एम.बेलोकार यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार दाखल करु इच्छित असलेल्या ग्रामपंचायत शेंदोणा सरपंच, पोलीस पाटील यांनी दिलेला वारसांचा अहवाल, मयत अर्जदार केवलराव रामधन पवार यांचे मृत्यूप्रमाणपत्राची सत्यप्रत आणि त्यांचे आधारकार्डच्या छायांकीत प्रती, वारसांचे प्रमाणपत्र, मृत्यूप्रमाणत्र, सहा आधारकार्ड यांच्या प्रती अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय ? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | .. अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. ०१ बाबत** :-

३. अर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा रेफरंन्स अर्जदाराने भुमीसंपादन अधिनियम,१८९४ चे कलम १८ अन्वये दाखल असून प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांच्या पुराव्याकरीता प्रलंबीत आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या पुराव्याच्या अनुषंगाने ग्रामपंचायत शेंदोणा सरपंच, पोलीस पाटील यांनी दिलेला

वारसांचा अहवाल, मयत अर्जदार केवलराव रामधन पवार यांचे मृत्यूप्रमाणपत्राची सत्यप्रत आणि त्यांचे आधारकार्डच्या छायांकीत प्रती, वारसांचे प्रमाणपत्र, मृत्यूप्रमाणत्र, सहा आधारकार्ड यांच्या प्रती अभिलेखावर दाखल करीत आहे. तरी, त्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट गैरअर्जदार यांचेतर्फे सहा. सरकारी वकील यांनी असा युक्तीवाद केला की, संबंधीत कागदपत्रे दाखल करण्यास अर्जदारांनी खूप विलंब केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा रेफरंन्स हा अर्जदार यांच्या पुराव्याकरीता प्रलंबीत असून, अर्जदार हे ग्रामपंचायत शेंदोणा सरपंच, पोलीस पाटील यांनी दिलेला वारसांचा अहवाल, मयत अर्जदार केवलराव रामधन पवार यांचे मृत्यूप्रमाणपत्राची सत्यप्रत आणि त्यांचे आधारकार्डच्या छायांकीत प्रती, वारसांचे प्रमाणपत्र, मृत्यूप्रमाणत्र, सहा आधारकार्ड यांच्या प्रती दाखल करु इच्छीत आहे. तसेच त्या दस्तऐवजांच्या अनुषंगाने गैरअर्जदार यांना अर्जदार यांचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. संबंधीत दस्तऐवज अभिलेखावर आले तर प्रस्तुतचा रेफरंन्स गुणदोषावर निकाली काढण्यास उपयुक्त ठरु शकतात त्यामुळे ते दस्तऐवज अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि अर्जदार यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. २४ हा मंजुर करण्यात येत आहे आणि अर्जदार यांना संबंधी दस्तऐवज दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.02.16 17:22:18 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : १६.२.२०२६

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per original Order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- C.R.Gadge |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :- 16.2.2026 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 16.2.2026 |
| 5) | Order uploaded on | :- 16.2.2026 |